# हस्तपुस्तिका -१४

## बाजार विभागाने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके

### विशेष सूट, परवानगी किंवा अधिकारी मिळविणे

- परवानाधारक अनुसूची जज मध्ये अंतर्भूत असलेले व महानगरपालिका आयुक्तांनी मंजूर केलेले व्यवसाय (कोल शॉप, मिल्क डेअरी, हेअर कटींग सलून आणि डिसपेन्सरी वगळून) करण्याचा परवाना महानगरपालिका मंडईमध्ये गाळे/जागा/दुकाने इत्यादी वितरण करतेवेळी मिळवतील. अनुज्ञापत्रातील सर्व अटी व शर्ती अनुज्ञापत्रधारकावर बंधनकारक असून त्यामधील कोणत्याही अटी आणि शर्तीचा भंग केल्यास कारवाई करण्यात येते.

- विनंतीवरुन अटी आणि शर्तीमध्ये सूट म्हणजे व्यवसाय, जादा वस्तू, जादा जागा, आराखडा, नामफलक, शो केस, लॉफ्ट, गोडाऊन, तात्पुरते पावसाळी छप्पर इत्यादींकरिता आवश्यकतेनुसार परवानगी देण्यात येईल.

- विनंतीवरुन बाहेर देशामध्ये नाशिवंत वस्तू निर्यात करण्याकरिता आरोग्य प्रमाणपत्र देण्यात येईल.

- बाहेरील देशामधून आयात करण्यात येणारे मांस हे मुंबई शहरापुरते मर्यादित राहील आणि त्याचा परवाना नियमाप्रमाणे घ्यावा लागेल.

- नियमाप्रमाणे महानगरपालिका बाहेरील मंडयांना मटण, बीफ, पोर्क, चिकन आणि कोल्ड स्टोरेज विक्रीचा परवाना घ्यावा लागेल.

- परवानाधारकाला महानगरपालिका मार्केटच्या नियमाप्रमाणे सूट देण्यात येईल.

- वार्षिक गाळाभाडे आगाऊ भरणा केल्यास त्यावर ८ टक्के सूट व ६ महिन्यांचे आगाऊ भाडे भरणा केल्यास त्यावर ४ टक्के सूट देण्यात येते.

- गाळाभाडे/जागाभाडे त्याच महिन्यामध्ये भरणा करणे आवश्यक आहे, अथवा त्यावर स्थायी समिती ठरावानुसार दंड आकारण्यात येतो.